नमुना 
आवक क्र. ७६
दि. ३१/८/२०२१

जोडपत्र - "अ"
(नियम ३ पहा)

माहिती अधिकार अधिनियम, २००५ अन्वये माहिती मिळण्याबाबतच्या अर्जाचा नमुना

मिरा भाईंदर महानगरपालिका
नगरसचिव विभाग
जा.क्र. ... आ ४१५
आवक क्र. ४३/२०२१
दिनांक :- ४/८/२०२१

प्रति,

मा. जनमाहिती अधिकारी,
आयुक्त कार्यालय,
मिराभाईंदर महानगरपालिका,
भाईंदर (प.) - ४०११०१
माहिती अधिकारी

१) अर्जदाराचे नाव : सुनिल उत्तमराव भगत.

२) पत्ता : ४०१/ड, साई संकल्प सदन, गांवदेवी मंदिर जवळ, नवघर गांव, भाईंदर (पूर्व) - ४०११०५

३) आवश्यक असलेल्या माहितीचा विषय : आयुक्त कार्यालयास प्राप्त लक्षवेधी-तारांकीत प्रश्न बाबत.

(एक) माहितीचा विषय : अ) विधानसभा, विधान परिषद सदस्यांमार्फत मिराभाईंदर महापालिकेस प्राप्त लक्षवेधी, तारांकीत प्रश्नाबाबत शासनातर्फे पाठविलेल्या सर्व दस्तेऐवजांच्या साक्षांकीत प्रती पुरविणे.

ब) मिराभाईंदर महापालिका प्रशासनातर्फे शासनाकडे प्राप्त लक्षवेधी-तारांकीत प्रश्नाबाबत पाठविलेल्या माहितीच्या सर्व दस्तऐवजांच्या साक्षांकीत प्रती पुरविणे.

क) मिराभाईंदर महापालिकेस प्राप्त उल्लेखित कालावधीतील सर्व लक्षवेधी-तारांकीत प्रश्न पालिका वेब-साईट वर प्रसिद्ध केल्याची साक्षांकीत माहिती पुरविणे.

(दोन) माहिती ज्याच्याशी संबधित असेल तो कालावधी : दि. १ जानेवारी २०२१ ते अर्ज निर्णय होइपर्यंत.

(तीन) आवश्यक असलेल्या हिस्सा माहितीचे वर्णन : वरील प्रमाणे

(चार) माहिती टपालाद्वारे किंवा व्यक्तीशः : व्यक्तीशः

(पाच) टपालाद्वारे असेल ... : निरंक

४. अर्जदार, दारिद्र्य रेषेखालील आहे किंवा आहे (असल्यास, त्याच्या पुराव्यासहित छायांकित (झेरॉक्स) प्रत जोडावी) : निरंक

ठिकाण :- भाईंदर
दिनांक :- ३-८-२०२१

(सही)
अर्जदाराची सही
(सुनिल उत्तमराव भगत)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
नगरसचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./ ४३ /2021

दिनांक :- 04 /08/2021

प्रति,
श्री. सुनिल उत्तमराव भगत,
401/ए, साई संकल्प सदन,
गांवदेवी मंदिर जवळ, नवघर गांव,
भाईंदर (पू.), 4011015

विषय :- केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार 2005.
आयुक्त कार्यालयास प्राप्त लक्षवेधी, तारांकीत प्रश्न.

संदर्भ :- आपणांकडील दि. 04/08/2021 रोजीचा माहिती अधिकारातील अर्ज.

महोदय,

सामान्य प्रशासन विभाग, मि.भा.मनपा यांचेमार्फत आपणांकडील उपरोक्त विषयांकित संदर्भित पत्र दि. 04/08/2021 रोजी नगरसचिव विभागासंबंधीत माहिती आपणांस उपलब्ध करुन देणेसाठी या कार्यालयाकडे वर्ग केलेले आहे.

आपणांकडील संदर्भित पत्राचे अवलोकन केले असता, आपण दि. 01 जानेवारी 2021 ते अर्ज निर्णय होईपर्यंत विधानसभा, विधान परिषद सदस्यांमार्फत मिरा भाईंदर महानगरपालिकेस प्राप्त लक्षवेधी, तारांकीत प्रश्नाबाबतची माहिती अपेक्षीलेली आहे.

त्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, दि. 01 जानेवारी 2021 ते आज दिनांकापर्यंत विधानसभा, विधान परिषद सदस्यांमार्फत नगरसचिव विभागासंबंधीत प्राप्त लक्षवेधी, तारांकीत प्रश्नाबाबतची माहिती निरंक आहे.

सदर माहितीबाबत आपणास आणखी विचारणा करावयाची असल्यास कृपया माझ्याशी प्रत्यक्ष अथवा भ्रमणध्वनी क्र. 9967481732 वर संपर्क साधावा.

तरीही आपले समाधान न झाल्यास अपिलीय अधिकारी तथा नगरसचिव श्री. वासुदेव शिरवळकर, नगरसचिव विभाग, तिसरा मजला, मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.) यांचेकडे 30 दिवसात प्रथम अपिल दाखल करता येईल.

Received
Bhagat 6/8/021

(कैलास प्रा. म्हात्रे)
जनमाहिती अधिकारी
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका